

श्री.जयदिप डाकरे सर  श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

**Study From Home**

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता - चौथी (13 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस तेरा :







गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

स्वच्छतेसंदर्भात कोणताही एक संवाद तयार करा व वहीत लिहा.


## आम्ही संवाद करतो

### २. बोलणारी नदी

टेस्ट सोडवा











- वरील चित्रांतील पक्षी व प्राणी आपल्या पिलांशी काय बोलत असतील याची कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिहा.

## खालील संख्या सूचनेनुसार लिहा.

**२. संख्याज्ञान**

टेस्ट सोडवा

२. संख्या वाचा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १००१ | २००२ | ४००४ | ५०५१ | ३०६७ | ७०३८ | ९००० |
| १०१० | २०२० | ४०४० | ५१०५ | ३६०७ | ७३०८ | ९००९ |
| ११०० | २२०० | ४४०० | ५१५० | ३६७० | ७०८३ | ९०९० |
| | | | ५५०१ | ३०७६ | ७८३० | ९९०० |

३. दिलेल्या संख्या वाचा. अक्षरांत लिहा.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२३५ | २३४१ | ३५०७ | ४११५ | ५०४५ | ६७८७ | ७८९० | ८८८८ | ९००७ |

४. प्रत्येक अंक एकदाच वापरून चार अंकी पाच संख्या लिहा आणि वाचा.

२, ३, ६, ७

५, ८, ०, ९

५. संख्यापाटीवर एककस्थानचा अंक, दशकस्थानचा अंक, शतकस्थानचा अंक व हजारस्थानचा अंक बदलून वेगवेगळ्या चार अंकी संख्या तयार करा व वाचा.

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| ३ | ० | २ | ५ |

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| १ | ४ | २ | ६ |

### पाच अंकी संख्या : ओळख

रेश्मा : सर्वांत मोठी चार अंकी संख्या कोणती आहे ?

सचिन : नऊ हजार नऊशे नव्याण्णव !

नर्गिस : त्याच्या पुढची संख्या कोणती ?

ताई : करूनच पाहू. संख्येत १ मिळवला, की पुढची लगतची संख्या मिळते, हे माहीत आहे ना ? आता ९९९९ + १ ही बेरीज उभ्या मांडणीत करू.

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| | १ | १ | १ | |
| | ९ | ९ | ९ | ९ |
| + | | | | १ |
| १ | ० | ० | ० | ० |

९ एकक + १ एकक हे १० एकक होतात.
त्यांचा १ दशक (हातचा) तयार होतो.
तो दशकाच्या घरात मांडू. ९ द + १ द मिळून १० दशक.
त्यांचा १ शतक (हातचा) होतो.
तो शतकाच्या घरात मांडू.
९ श + १ श मिळून १० शतक.
१० शतकांचा १ हजार. तो १ हजार, हजाराच्या घरात मांडू.

हजाराच्या घरात ९ + १ म्हणजे १० आले, म्हणून ती संख्या दहा हजार आहे. हे दहा हजार एकत्र करून त्याला 'एक दशहजार' म्हणू. त्याच्यासाठी हजाराच्या डावीकडे एक नवे स्थान निर्माण करू. त्याला 'दह' हे नाव देऊ.

Write the following numbers as instructed. **2. Number Work**

टेस्ट सोडवा


2. Read the numbers.


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1001 | 2002 | 4004 | 5051 | 3067 | 7038 | 9000 |
| 1010 | 2020 | 4040 | 5105 | 3607 | 7308 | 9009 |
| 1100 | 2200 | 4400 | 5150 | 3670 | 7083 | 9090 |
| | | | 5501 | 3076 | 7830 | 9900 |

3. Read the given numbers. Write them in words.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1235 | 2341 | 3507 | 4115 | 5045 | 6787 | 7890 | 8888 | 9007 |

4. Using each digit only once, write five four-digit numbers and read them.




5. On a number slate, write different four-digit numbers by changing, one at a time, digits in different places. Read each number.

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| 3 | 0 | 2 | 5 |

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 2 | 6 |

## Introducing five-digit numbers

**Reshma :** Which is the biggest four-digit number?

**Sachin :** Nine thousand, nine hundred and ninety-nine!

**Nargis :** Which is the next number?

**Tai :** Let's work that out. When we add 1 to a number, we get the next number. You remember that, don't you? Now, we'll do the addition 9999 + 1 in vertical arrangement.

9 units and 1 unit make 10 units. That gives 1 ten to carry over. Write that in the tens place.

9T + 1T make 10 tens. That gives 1 hundred to carry over. Write that in the hundreds place.

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| | 1 | 1 | 1 | |
| | 9 | 9 | 9 | 9 |
| + | | | | 1 |
| 1 | 0 | 0 | 0 | 0 |

9H + 1H make 10 hundreds. 10 hundreds is 1 thousand. Write that 1 thousand in the thousands place.

We get 9 + 1 = 10 in the thousands place. So, this number is ten thousand. We make a new ten thousands place for it on the left of the thousands place. We call it the 'TTh' place.

टेस्ट सोडवा

## Listen carefully and read. Revision

### One at a Time

**1. Listen carefully and read with me.**
लक्ष देऊन ऐका आणि माझ्याबरोबर वाचा.

Priya liked sweets.
Her Granny had a jar
full of sweets.
She gave Priya
one sweet at a time.
But Priya wanted more.
Many, many more.





She quickly put her hand in the jar of sweets.
She took one, two, five, ten, many.
But her hand was stuck in the jar.
She could not take it out.
She began to cry.
"Oh, what shall I do ?"
"Let go of the sweets,"
said her Granny.





Priya let go of some sweets.
Still, her hand would not come out.
She let go of some more sweets.
Now there was only one in her hand.
Her hand came out of the jar easily.



She began to smile,
and looked at her Granny.
Granny smiled too. Priya said,
"Now I will take only one at a time !"

उतारा वाचा व समजून घ्या.

## २. सजीवांचे परस्परांशी नाते

टेस्ट सोडवा

माणसाला जशी प्राण्यांची गरज असते, तशी वनस्पतींची सुद्‌धा असते. अन्नधान्य, भाजीपाला, फळफळावळ या गोष्टी माणसाला वनस्पतींकडूनच मिळतात. माणसाला फुलांची सुद्‌धा खूप आवड असते. निरनिराळ्या कारणांसाठी आपण फुले वापरतो. फुले आपल्याला वनस्पतींपासूनच मिळतात. सुती कपड्यांसाठी लागणारा कापूसही वनस्पतींपासून मिळतो.

आपल्या गरजा पूर्ण करणाऱ्या वनस्पतींची आपण पद्‌धतशीर लागवड करतो. बिया पेरतो. त्यांना व्यवस्थित पाणी मिळेल याची खबरदारी घेतो. जरुरीप्रमाणे खते देतो. कीड लागू नये म्हणून कीटकनाशके फवारतो.

वनस्पतीदेखील आपल्याला भरभरून देतात. आपल्या गरजा पूर्ण करतात.

परिसरातल्या इतर सजीवांनाही अन्न परिसरातूनच मिळते. भूक लागली तर सरडे किडे खातात. काही प्रकारचे साप उंदीर आणि बेडूक खातात. वाघ हरणांना खातो. शेळ्या-मेंढ्या झाडपाला खातात. गाई-म्हशी गवत खातात. म्हणजे सर्व सजीवांना त्यांचे अन्न परिसरातूनच मिळते.

- **नवीन शब्द शिका**

**वृक्षवासी :** (वृक्ष=झाड, वासी=राहणारा) जीवनातला जास्तीत जास्त वेळ झाडांवर घालवणारे प्राणी; झाडावर राहणारे प्राणी.

माकडे आणि खारी असे प्राणी झाडावरच मुक्कामाला असतात. त्यांना त्याचे काही फायदेही मिळतात. उंचावर असल्याने शत्रूपासून आपला बचाव करणे त्यांना सोपे जाते. शिवाय फळे खाऊन ते आपले पोटही भरतात. त्यांना वृक्षवासी प्राणी म्हणतात.

ज्या झाडांच्या आधाराने ते जगतात, त्या झाडांना नकळत ते मदतही करतात. वृक्षवासी प्राणी इकडे तिकडे फिरताना त्यांच्या विष्ठेतून फळांच्या बिया परिसरात सगळीकडे पसरतात. त्यामुळे नवीन ठिकाणी झाडे उगवायला मदत मिळते.काही प्रकारच्या पक्ष्यांनाही झाडांचा उपयोग घरटी बांधण्यासाठी होतो.







वृक्षवासी प्राणी

# २. संतांची कामगिरी

## स्वाध्याय सोडवा.

टेस्ट सोडवा

### स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संत नामदेव ........... निस्सीम भक्त होते.

(आ) ज्ञानेश्वरांनी तरुण वयात पुण्याजवळ ........... येथे जिवंत समाधी घेतली.

(इ) संत तुकारामांनी आपल्या वाटणीची कर्जखते ............ नदीमध्ये बुडवली.

(ई) समर्थ रामदासांनी बलोपासनेसाठी ठिकठिकाणी ........... मंदिरे उभारली.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) श्रीचक्रधर स्वामींना कोणते भेदभाव मान्य नव्हते ?

(आ) संत नामदेवांनी लोकांच्या मनांत कोणता निर्धार निर्माण केला ?

(इ) संत एकनाथांनी लोकांना कोणता उपदेश केला ?

(ई) समर्थ रामदासांनी कोणता संदेश दिला ?

**३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) संत ज्ञानेश्वर झोपडीत दार बंद करून का बसले ?

(आ) संत तुकारामांनी लोकांच्या मनावर कोणता संदेश बिंबवला ?

**उपक्रम**

पाठात आलेल्या संतांशिवाय अन्य संतांची चित्रे मिळवून त्याखाली त्यांचे विचार लिहा.

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here